|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office जनसंपर्क विभाग

जळगाव दि. 19 ( ) ही तरुणाई उदयाचा भारत घडविणारी आहे. शिवाजी महाराज केवळ महाराष्ट्राचे आदर्श नाहीत तर अखिल भारतीयांचे आदर्श आहेत. तेव्हा शिवाजी महाराजांचे विचार आचरणात आणण्याचे आवाहन शिवचरित्राचे अभ्यासक प्रा.जोगेंद्रसिंग बिसेन (लातूर) यांनी केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सोमवार दि.19 फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात ` **जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज**` या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी केंद्रीय माजी मंत्री विजय नवल पाटील, जिजामाता प्रतिष्ठानचे अध्यक्ष पी.ई.तात्या पाटील, कार्यकारणी सदस्य, ॲड.शांताराम पाटील, एस.पी.जवळकर (औरंगाबाद) उपस्थित होते. यावेळी मंचावर कुलसचिव भ.भा.पाटील, विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा.अनिल डोंगरे, विभागप्रमुख डॉ.तुकाराम दौड तसेच शिवरायांच्या वेशभूषेत तुषार पाटील आणि जिजाऊंच्या वेशभूषेत स्नेहा बढे हे दोघे विद्यार्थी तर बाळ संभाजी आदित्य सुरवाडे उपस्थित होते.

प्रा.जोगेंद्रसिंग बिसेन यांनी दोन महत्वाच्या घटनांचा आधार घेत शिवाजी महाराजांचे चरित्र उपस्थितांसमोर सादर केले. शिवरायांसोबत विविध जाती, धर्माचे लोक होते. त्यांनी कधीही जाती-पातीचे राजकारण केले नाही. सिध्दीजोहर, दिलेरखान, प्रतापराव गुजर, मोरारबाजी, येसाजी, यांच्यासोबत घडलेले विविध प्रसंग त्यांनी आपल्या व्याख्यानात मांडले. शिवाजी महाराजांचे मोठेपण कशात होते तर त्यावेळी लौकिक अर्थाने लोकशाही नव्हती पण व्यवहारीक अर्थाने लोकशाही होती. अशा अनेक पैलूंचा आधार घेत प्रत्यक्ष शिवाजी काय होते हे त्यांनी समजावून सांगितले. आई कशी असावी ती जिजाऊ सारखी असावी ज्यांनी असा शिवाजी घडविला की ज्या महापुरूषाचा गौरव आपण 388 वर्षानंतर देखील करीत आहोत. जिजाऊंनी शिवाजी महाराजांमध्ये मातृत्वाचा भाव नेहमी निर्माण केला तेव्हा प्रत्येकाने पर स्त्री मातेसमान हा भाव अंगीकारणे महत्वाचे आहे. देशद्रोहाची परंपरा मोडीत काढत अस्मिता जपण्याची अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त केली.

माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील यांनी वृक्षलागवड, पर्यावरण संवर्धन, प्लॅस्टीक पिशव्यांचा वापर टाळा, कापडी पिशव्या वापरण्याचे आवाहन केले तसेच शिवाजी महाराज यांच्या अध्यासनावर संशोधन करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीचा पन्नास हजार रूपयांचा धनादेश यावेळी कुलगुरुंकडे सुपूर्द केला. पी.ई.तात्या पाटील यांनी पोवाड्याद्वारे शिवाजींचे आत्मचरित्र सहज पोहोचते तेव्हा पोवाड्याद्वारे शिवाजींचा इतिहास काही मिनीटात समजतो. तसेच विद्यापीठातील शिवाजी महाराज अध्ययन व संशोधन केंद्र हे सर्वात मोठे अध्ययन केंद्र बनविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. एस.पी.जवळकर यांनी स्त्री आई म्हणून ज्याला कळाली तो शिवबा, बहीण म्हणून कळाली तो मुक्ताईचा ज्ञानोबा, पत्नी म्हणून कळाली तो सावित्रीचा ज्योतीबा आणि स्त्री ज्याला कळाली तो रमाईचा भिमराया तेव्हा पुस्तकाशी नाते जुळवा, छत्रपती हे डोक्यावरून जाण्यापेक्षा डोक्यात घाला, शिका, राष्ट्र घडवा, कुटुंब सुसंस्कृत घडवा आणि राष्ट्राला महासत्ता बनवण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले.

पान 2 वर

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
**North Maharashtra University, Jalgaon**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**



अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांनी शिवाजी महाराजांसारखे व्यक्तिमत्व हे महाराष्ट्रातच नव्हे तर भारत देशातच नाही संपूर्ण विश्वात अतुलनीय, अद्वितीय, अलौकीक असे आहे. शौर्य, पराक्रम, शरीरिक क्षमता, ध्येयवाद, कुशल संघटन, कडक व नियोजनबध्द प्रशासन, मुत्सद्दीपणा, धाडस, असे उच्च कोटीचे गुण शिवाजी महाराजांच्या व्यक्तीमत्वात होते असे ते म्हणाले.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज अध्ययन व संशोधन केंद्राचे प्रभारी विभागप्रमुख डॉ.तुकाराम दौड यांनी प्रास्ताविक केले. संगीत विभागाच्या खेमराज पाटील याने पोवाडा सादर केला. यावेळी आवाहन पुस्तिकेचे विमोचन पाहूण्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सारंग येवले यांनी केले. विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. अनिल डोंगरे यांनी आभार मानले.

**प्रतिमेची मिरवणूक**

शिवजयंती निमित्त सकाळी विद्यार्थ्यांनी शिव प्रतिमेची जल्लोषात मिरवणूक काढली. यावेळी कुलसचिव भ.भा.पाटील, अधिसभा सदस्य दिपक बंडू पाटील यांच्याहस्ते प्रतिमा पुजन व पुष्पहार अर्पण करण्यात आला. मध्यवर्ती ग्रंथालयात शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व सरस्वती यांच्या प्रतिमेस कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील यांनी पुष्पहार अर्पण केला. वसतिगृहापासून प्रशासकीय इमारतीपर्यंत ही मिरवणूक काढण्यात आली. उत्साहाने विद्यार्थी यात सहभागी झाले होते. मिरवणूकीत घोडयावर बसलेले मावळे आणि बग्गीत छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभुषा परिधान केलेले विद्यार्थी सहभागी होते. मिरवणूकीत विद्यार्थिनींचाही सहभाग लक्षणिय होता. विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेच्या विद्यार्थ्यांनी लेझीमनृत्य सादर केले.

---

जा.क्र. : उमवि/16/हस्तदेय/2018 दिनांक : 19 फेब्रुवारी, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
जनसंपर्क अधिकारी यांचे करीता